या विचारात त्यान लंका केव्हा सोडली आणि तो राम जिथे होता तिथे केव्हा आला हे कळले नाही. हनुमानांचे आगमन होत असता जयजयकाराने आकाश भरुन गेले. हनुमानाने आणलेली बातमी काय आहे, हे जाणुन घेण्याची इच्छा सर्वांच्या मनांत निर्माण झाली.

रामान हनुमानाला हृदयाशी धरल. त्यांच्या नेत्रातून अश्रु वाहू लागले. लक्ष्मणाच्याहि नेत्रातून गंगा-यमुना वाहू लागल्या.

रामान त्यास एकांतात नेऊन कुशल प्रश्न विचारले. तेंव्हा हनुमानाने आणलेला चुडा श्रीरामाला दाखविला. सीतेच्या हातातील तो मंगल अलंकार पहाताच रामाचे हृदय विदीर्ण झाले. प्रिय वाटणाऱ्या व्यक्तिची आठवण देणारी कोणतीहि गोष्ट घडली तरी प्रेमीजनांना आनंद होतो. रामाची सर्व व्यथा डोळ्यावाटे बाहेर पडत होती. ते दृश्य पाहून सुग्रीवादिकांना कसेसेच वाटले.

नंतर हनुमानाने लंकेत घडलेली सर्व हकीकत सांगितली. रावणाची विवेकशक्ति हरपली असून अनेक विद्या आणखी सिध्द करण्यासाठी तो व्रतस्थ होणार आहे. तत्पूर्वी आपण हल्ला करावा म्हणजे आपल्या हिताचे होईल असेहि सांगितले.

रामाने हनुमानाचे कौतूक केले. थोर लोकांना दुसऱ्याचे अल्पसे उपकारहि मेरु पर्वताप्रमाणे मोठे वाटतात.

सीतेची कुशलवर्ता कळाल्याने रामाच्या हृदयांत थोडीशी शांती झाली. परंतु सितेला पारतंत्र्यात राहण्याची पाळी याची आणि आपण हतबुध्द होऊन येथे रहावे याचा त्यांना राग आला.

लक्ष्मणाने रामाची समजूत काढली व लौकरच युध्दाची तयारी करण्याची आज्ञा सैन्याला दिली.

श्रीहनुमानाने आपल्या सर्व सैनिकांना सर्व विद्यांच्या सहाय्याने तयार राहण्यास आज्ञा केली. मुसळधार पाऊस पाडणाऱ्या, असंख्य विजांचे तांडव घडवून आणणाऱ्या, अनेक ठिकाणी एकाच वेळी आगी लावणाऱ्या विद्या सिध्द झाल्या.

सैन्याच्या प्रस्थानता श्रीराम आणि लक्ष्मण अग्रभागी होते. श्री सुग्रीव आणि हनुमानाच्या विमानातून त्याचा प्रवास होत होता. बरोबरीला दुर्मर्षण, नल, निल, काल, सुजेण, कुमुद इत्यादि अनेक विद्याधर राजे आपआपल्या विमानांत बसून निघाले होते. निरनिराळ्या रंगाच्या पताकांनी आकाशमंडळ सुशोभित दिसत होते.

श्रीरामाचे आगमन समुद्राच्या काठी झाले. सर्व सैन्यांनी अक्षय उद्यानांत विश्रांती घेतली. सैन्याच्या आगमनाने वनातील निरवता भगली होती. पशु-पक्षी घाबरले होते. आजूबाजूचे अनेक राजे भयभित होऊन काय घडणार कोणा न कळे अशा चेहऱ्याने रामाला येऊन मिळाले होते. श्रीरामाचे वैभव विद्याधरांच्या संगतीने आणखिनच वाढले होते.

श्रीरामाच्या समुद्रापर्यंत पोचण्याची वार्ता लंकेत पोचली रावणाने आपले सर्व भाऊ जवळ बोलाविले आणि त्यांना तो म्हणाला. माझ्या रक्ताच्या भावानो, कदाचित लंकेच्या उच्छेदाचाहि क्षण समीप असेल किंवा भरतखंडावर आपली सत्ता स्थापन होण्याचाहि योग असेल. भविष्यांत काय असेल ते असेल, पण क्षात्रधर्माला मनांत ठेवून आपण हे युध्द जिंकलेच पाहिजे. रामासारख्या एका तुच्छ संस्कृतीच्या पादचारी माणसाने आमच्या या सर्वश्रेष्ठ संस्कृतीला आव्हान द्यावे हे उपमर्दकारक आहे. माझ्यापुढे आज सीतेचा विचार नाही. पण क्षात्रधर्माची पंरपरा टिकविण्यासाठी व आपल्या या वैज्ञानकि संस्कृतीच्या रक्षणासाठी एकत्र झालेच पाहिजे. आपण जर हरलो तर या पृथ्वीवर कृमि-कीटकांचे राज्य झाल्यासारखे् होईल. भरत-खंडाचे स्वामित्व लंकेकडे रहावे असे वाटते तर आपण साऱ्यांनी एका दिलान या युध्दांत मला सहयोग द्यावा.

त्यावर बिभिषण शांतपणे म्हणाला, महाराज, आपणाला युध्द टाळता येत असेल तर ते अवश्य टाळावे असे क्षात्रधर्माचे वचन आहे. युध्द हा निर्णय रानटी उपाय आहे. विनाशाच्या

वाळ्वंटात तुम्ही क्षात्रधर्माचे रोपटे जिवंत ठेवण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत आहांत. सीतादेवाला सन्मानपूर्वक श्रीरामाला परत केल्यास विनाशाचा मार्ग टळणार आहे. सीतेलाच अभिलाष आपण का ठेवावा? विनाशाची देवता बनणाऱ्या सीतेला येथून परत पाठविल्यास हजारो स्त्रियांचे वैधव्यापासून परिरक्षण होणार आहे. मांगल्य युध्दांत नाही. क्षत्रियत्वाचे संरक्षण युध्दाने होत नाही. साऱ्या जगाचा विरोध स्वीकारुन कोण बरे जिंकला आहे? विद्याधर संस्कृतीचा विनाश नको असेल तर सीतामातेला परत करावे. रामासारख्या अत्यंत शांत, परोपकारी आणि आदरणीय पुरुषाचा आपण सन्मान करावा आणि हे युध्द टाळावे.

या उपदेशाने रावणाने पित्त आणखिनच खवळ्ले. त्याच्या नेत्रांतून जणूं आगीचे डोंबच बाहेर पडत होते.

नाही, नाही, बिभिषणा, रावण चवताळून ओरडला, नीचा, माझ्यासमोर रामाची स्तुति. आपल्यास नष्ट करण्याची प्रतिज्ञा करणाऱ्याची स्तुति ! तू नमकहराम आहेस. खाल्ल्याघराचे वासे मोजणारा आहेस, लंकेला कलंक ठरणार आहेस.

रावणाचा मुलगा इंद्रजित मध्येच म्हणाला, काका, आपणाला कुणी सल्ला विचारला होता? तुम्ही पापभिरु आहांत हे सुप्रसिध्द आहे. चूकून क्षत्रिय कुलांत तुमचा जन्म झाला आहे. महाराज रावण जे सांगत आहेत तेच बरोबर आहे. रामाला भिऊन आम्ही सीतेला परत केली असा कलंक आम्हांला नको आहे. स्त्री कुणाची आहे हे आम्ही कधीच पाहिले नाही. आमच्या संस्कृतीत केवळ उपभोगाच आम्हांला माहित आहे. अमर्याद उपभोगासाठी आमची संस्कृति या भूतलावर आली आहे. आम्हांला पोकळ धर्माच्या आणि संस्कृतीचा उपदेश करु नका. आमच्याजवळ काय कमी आहे? ज्याक्षणी आमचा विचार होईल त्याक्षणी रामासहित साऱ्या विरोधी शत्रुंचा आणि मित्रांचाहि आम्ही नाश करु. पिताजींची इच्छा असेल तर एकटा इंद्रजित रामाला इथे आणून पिताजींच्या चरणी त्याला लोळण घ्यायला लावू शकतो.

बिभिषण त्याला उद्देशून म्हणाला,   तुझा गर्व व्यर्थ आहे.  लहान तोंडी मोठा घास घेऊन वडिलांच्या अविवेकरुपी अग्नीस तेल औतू नकोस.  तुम्ही जसे विद्याधर आहांत तसेच हनुमान, सुग्रीव, नल, नील हे देखील विद्याधरच आहेत.  तुमचा विनाश हवा असेल तर मात्र माझे कांहीच म्हणणे नाही.

रावण अत्यंत रागावलेला होता.  बिभिषणाचा उपदेश ऐकून तो इतका बेभान झाला की, त्याने तलवार उपसली.  आता भयंकर कांही तरी होणार या शंकेने महामंत्र्यांनी रावणाचे पाय धरले आणि रावणाला शांत केले.

तेंव्हा बिभिषण म्हणाला,   ठीक आहे.  तुमची कुठपर्यंत हिंमत आहे मला दिसून आले. मीहि आई रत्नश्रवाचाच मुलगा आहे.  तुझा नाश झालेला ऐकूनच तुझां चेहरा पाहायला येईन. त्यावेळी तुझे डोळे कायमचे मिटलेले असतील.  तुझा मुकूट धुळीत लोळत असेल.  अंगातील रक्त प्रवाहित होऊन लंकेची माती चाटीत असेल--------

असे बोलून बिभिषणाने लंका सोडली.  त्याच्या डोळ्यांत आसवे उभी राहिली.  आपण या लंकेत राहायलां अपात्र ठरावे, आपल्या मोठया भावाला नाही नाही ते बोलण्याची पाळी यावी याचे त्याला राहून राहून दु:ख होत होते.

रावणालाहि बरे वाटले, शत्रुचे समर्थक जर लंकेत राहिले तर लंकेला धोका आहे.  रावण शांत झाला.  त्याच्या मुलांनीहि वडीलांच्या इच्छेप्रमाणे सर्व तऱ्हेच्या युध्दाची तयारी चालविली. तटवंदीची पुन:सर्व व्यवस्था करण्यात आली.  बिभिषणाच्या जाण्यामुळे कदाचित लंकेतील माहिती कळेल म्हणून सारी सैन्य-व्यवस्था बदलण्यांत आली.  बिभिषण गेला म्हणून त्याचे मित्र विद्युतघन, इंद्रवज्र, प्रचण्ड, चमल, महाकाळ हेहि लंकेतून आपआपल्या शस्त्र-सामुग्रीसहित बाहेर पडले.  समुद्र ओलांडून सर्वांनी रामाचा आश्रय घेतला.

कांही विद्याधर म्हणाले की रावणाने मुद्दाम कपटाने याला इकडे पाठविले आहे. युध्द म्हटले की त्यात धर्म नसतोच. युध्द म्हणजे चारित्र्यहीनता युध्द म्हणजे कपटींपणा. जीवन जिथे संपते, तिथे युध्द सुरु होते. युध्द ही जगातील महान विनाशक शक्ति. परंतु बिभिषणाने आपल्या हृदयातील विचार पटवून दिले. रामालाहि गहिंवरुन आले. पुण्योदय असला म्हणजे रानावनांत, संकटात देखील मित्र सांपडतात. वाळ्वंटात देखील हिरवळ सांपडते. भयानक प्रसंगी मानवाला पुण्य हेच तारक असते. या पुण्याचा मूळ आधार आत्म्यांतील सद्‌गुणावर श्रध्दा. आत्मा अमर आहे, तो अविनाशी आहे, ज्ञानाने परिपुर्ण आहे अशी श्रध्दा. असंख्य उल्कापातांतहि मानवाची ही श्रध्दा ढळता उपयोगी नाही. शरीर, सांसारिक उपभोग, धनसंपत्ति, इत्यादि सारे कांही नश्वर आहे. अशा नश्वरतेतून आत्म्याची अमरता जाणवेल असे विचार जागृत झाले पाहिजेत.

रामाने बिभिषणाचे अंतरंग जाणले. त्याने बिभिषणाला हृदयाशी धरले. राम म्हणाले, हे सत्पुरुषा, रावणाला तुम्ही सदुपदेश केला पण सापाला दुध पाजल्याने त्याचे जसे विषात रुपांतर होते तसेच रावणाचे झाले आहे. रावणाचा मरणाचा क्षण जवळ आला असेल तर त्याला कोण काय करणार ? तुम्ही आजपासून आमचे परममित्र आहांत. आम्हांला लंकेच्या लोभ आहे असे नाही. लंकेचे हे वैभव केवळ निश्चेतन आहे. तिथे मानवी मूल्यांची स्थापना करण्यासाठीच आम्ही लंकेवर चढाई करण्याचे ठरविले. आपण आमच्या या कार्यात सहभागी झालात तर लंकेचे राज्य आम्ही आपणांस देवू. आम्ही ऐकले आहे की, आपण धर्मज्ञ आहांत, विवेकी आहांत, सारासार ग्रहण करण्याची बुध्दी विलक्षण आहे. म्हणूनच बिभीषणा, आम्ही आपणांस आमचे मित्र समजत आहोत.

रामाच्या हया शब्दांनी साऱ्यांना आनंद झाला, श्रीरामाचा जयजयकार करुन साऱ्यांनी या राम-बिभिषण भेटीचे कौतूक केले.

रावणाला हे ऐकूण फार दु:ख झाले की बिभिषण रामाला जाऊन मिळाला आहे. लंकेच्या पतनाला जणु हा अपशकुन झाला असे त्याला वाटले. रावणानें आपल्या सर्व मित्रांना दूत पाठवून युध्दासाठी आमंत्रित केले. लंकेच्या सर्व तटबंद्या पुन: चांगल्या करण्यात आल्या.

रावणाने नाना तऱ्हेच्या मंत्र सामर्थ्याने शत्रु फसेल अशा युक्त्या अंमलात आणल्या. त्याने विद्याधरांना जवळ बोलावून घेतले आणि म्हणाला, हे मित्रांनो, आपल्या पैकी कांही विद्याधर रामाला जर मिळाले नसते तर रामाचा नाश करणे फार सोपे होते. पण आपल्यांतील कांही विद्याधरांनी त्याचा पक्ष घेतल्याने रामाचे सामर्थ्य वाढले आहे. तरी परंतू आपण सर्वांनी एकदिलाने या उत्तरेकडील आक्रमणाला तोंड दिले पाहिजे. आपल्या मंत्रशक्तिला जणुं हे आव्हानच आहे. रामासारख्या य:कश्चित मानवाला धुळीला मिळविता आल्यास अखिल भरतखंडाचे राज्य आपणाला मिळेल. तरी एकजुटीने हाच प्रयत्न केला पहिजे की रामाचा वध कसा करता येईल!

श्रीरामाच्या सैन्याने समुद्र ओलांडून लंकेत्त प्रवेश केला. प्रवेश करता क्षणीच रावणाच्या तटरक्षक सैनिकांनी सर्व बाजुंनी हल्ला चढविला. परंतु नल, नील, जाम्बुवन्त इत्यादि विद्याधरांनी त्या सर्वांचा नाश केला. रावणाच्या सैनिकांनी विविध मंत्राचा उपयोग केला. पण सुग्रीवाच्या सैनिकापुढे त्यांचे कांहीच चालले नाही.

रावणाच्या दरबारी एकाहून एक प्रचण्ड सेनापति होते. त्यांच्याशी युध्द करण्याचे सामर्थ्य कोणाच्याही अंगी नव्हते. परन्तु आज असा प्रसंग आला होता की या पादचारी राम-लक्ष्मणापुढे त्यांचे शौर्य फिक्के पडले होते. यामुळे तर राक्षसवंशीयांच्या सैनिकांना आणि योध्दांना अधिकच चेव आला होता. आपल्याच भूमीवर येऊन आपला पराभव करणाऱ्या शत्रुंबद्दल फार मोठा तिरस्कार त्यांच्या मनांत निर्माण झाला होता आणि त्यामुळेच सर्व सामर्थ्यनिशी ते निकराने लढण्याचा प्रयत्न करीत होते.

रावणाकडे चार कोटी तरणीबांड मुले होती. त्यांच्या शरीराकडे पाहिले म्हणजे यमालाहि स्वत:चा विसर पडत असे. ती तेज:पुंज मुले तर या युध्दाने आनंदित झाली होती. त्यांच्या पराक्रमाला हे नवे आवाहन होते.

त्या सर्वांनी आपआपल्या प्रचंड सामर्थ्यांने श्रीरामाच्या सैनिकावर हल्ला चढविला होता. मंत्राच्या सामर्थ्यांने कुणी पाऊस पाडीत होता तर कुणी आगीचा वर्षाव करीत होता. कुणी भयंकर विषारी विषारी सापांचा पाऊस पाडीत होता तर कुणी गरुड निर्माण करुन सापांचा फडशा पाडीत होता. विजांच्या कडकडाटाहूनहि भयंकर आवाज करणारे बाण सोडून ती मुले सर्व सैनिकात भीति निर्माण करीत होती. त्यांच्या विद्या-सामर्थ्याला आजपर्यंत अशी संधीच मिळाली नव्हती.

या युध्दाने सारी पृथ्वीच नष्ट होते की काय अशी शंका कांही साधु पुरुषांच्या मनांत निर्माण झाली होती. अहिंसेच्या साधनेत युध्दासारखी हिंसा कशी काय योग्य आहे असाहि विचार कांहीच्या मनांत निर्माण झाला. पण श्रीरामापुढे एकच प्रश्न होता तो म्हणजे सीतेची सुटका. त्यांचं गृहधर्मातील पहिलं कर्तव्य होतं ते म्हणजे आपल्या पत्नीच्या शीलाचं रक्षण! म्हणून त्यासाठी वाटेल ते करायला श्रीराम तयार होते. ज्याच्या ज्या वेळेचा धर्म तो निष्ठेने पालन करण्यांत हिंसा-अहिंसा असा प्रश्न उद्‌भवत नाही. गृहस्थ जीवनाचा जो आधारभूत धर्म आहे त्यांत कांहीसा भाग हिंसापूर्ण आहे. ती हिंसा कर्तव्य म्हणून, आवश्यक म्हणून करावींच लागते. राष्ट्र चालकांनाहि अशी हिंसा धर्म्य मानली आहे. अन्याय, अत्याचार आणि अधर्म यांच्या नाशासाठी केलेली हिंसा ही विहित मानली गेली आहे. अनेक जैन राज्ये, माहाराजे, सम्राट आणि चक्रवर्ति यांनी युध्दे केलेली आहेत. राज्ये निर्माण केली, त्यांचा सांभाळ केला आणि त्यांचं परचक्रापासूनहि रक्षण केलं. श्रीरामानंहि हाच आदर्श आपल्या डोळ्यापुढे ठेवला होता. जीवनाची विविध अंगे जाणून घेऊन जीवन जगण्यांतच मौज आहे यात शंका नाही.

युध्दाची धुमश्चक्री चालू असतांना वानरवंशीयांचा आणि राक्षसवंशीयांचा विनाश श्रीरामाने प्रत्यक्ष पहिला त्यांच्या मनांत करुणा निर्माण झाली. तो प्रलंयकारी विनाश पाहून कांही विचारवंताच्या हृदयांत दया निर्माण होणे साहजिक आहे. परंतु युध्दाचा नाश ज्यांना चढला होता असे मोठेमोठे योध्दे मात्र परस्परांची आयुध्दे नष्ट करण्यांत आनंद पावत होते. नानाप्रकारचे कौशल्ये दाखवून शत्रुपक्षांचा बिमोड करण्याचे अतुल व अचाट कार्य दोन्ही पक्ष पार पाडित होते. कधी रावणाची मुले सुग्रीवाच्या शोधात हिंडत होती. तर कधी बंधुशोकाने रडत होती. कधी

त्वेषानं परस्परांना उत्साह देऊन शत्रुंच्या सैन्यांत घुसुन हजारो योध्दांना यमाच्या घरी पाठवून देत.

इतक्यांत अत्यंत पराक्रमी असा इंद्रजित रणांगणात शिरला मेंढयांच्या कळपांत हत्तीने प्रवेश करावा असा तो भासला. रत्नहिऱ्यांनी मढविलेला त्याचा तो रथ, त्याचे भरजरी कपडे, त्याची विविध आयुधे ही सारी सूर्यप्रकाशांत चमचमत होती. इंद्रजिताला पाहतांच सुग्रीवालाहि चेव आला. मोठया योध्दाला पराजित करण्यांत जो आनंद असतो त्याची कल्पना केवळ योध्दाला असणार! इंद्रजिताने सुग्रीवाला पाहिले मात्र! त्याचा क्रोध अनावर झाला. डोळे इंगळ्यासारखे लाल झाले. व तो रागाने सुग्रीवाला म्हणाला,

अरे नीचा, रामासारख्या ढोंगी, कपटी माणसाला जाऊन मिळालास काय? तो तुला काय त्रैलोक्याचं साम्राज्य देणार आहे? ज्याला जमिनीवरू न चालता येत नाही, स्वत:च्या पत्नीचं संरक्षण करता येत नाही तो काय तुला देणार आहे? व्यर्थ मरण्यासाठी तू या ठिकाणी कां आलांस?

त्यावर सुग्रीव हसून म्हणाला, तुला व्याख्यान देता येतं हे मी आजच जाणलं! अरे हे व्यासपीठ नाही, रणक्षेत्र आहे. इथं शस्त्रांनीच बोलावं लागतं.

असं म्हणून त्यानं हजारो बाण एकाच वेळी सोडून इंद्रजिताचा रथ मोडून काढला.

इंद्रजित हा सामान्य योध्दां नव्हता. अनेक विद्यांनी तो पंडित होता. या अपमानाने रागावनू त्याने मेघस्त्र सोडले व रणांगणावर अंधार निर्माण केला. लगेच सुग्रीवाने पवनास्त्र सोडले, त्यासारशी वाऱ्याने मेघ कुठल्या कुठे पळून गेले. हे पाहून इंद्रजित अधिकच क्रोधीत झाला. त्याच्याकडे अनेक विद्या होत्या. त्याने नाग अस्त्रांच स्मरण करताच लक्षावधि नाग रणांगणात निर्माण झाले. त्या नागांनी रामाकडील मोठमोठया योध्दांना हैराण केले. अनेक

योध्दांचे हातपाय त्यांनी आवळून टाकले. आता फारच मोठा प्रसंग निर्माण झाला. इंद्रजिताचं सामर्थ्य फार मोठं आहे याची कल्पना रामाला बिभिषणानं दिली होतीच.

त्यावेळीउ रामानं लक्ष्मणाला म्हटलं, भाऊराया, तुला आठवतं की, आपण जेव्हा श्री कुलभूषण आणि देशभूषण मुनींच्या उपसर्ग दूर केला होता त्यावेळी त्यांनी आपणाला संकटात मदत करण्याचे वचन दिले होते.

लक्ष्मणालाहि तो प्रसंग आठवला. त्यांनी णमो अरिहंताणं जप करुन त्या देवाची आठवण करतांच तो देव धांवत तेथे आला आणि म्हणाला, हे श्रेष्ठ पुरुषांनो, मी आपली कोणती सेवा करु?

त्यावर श्रीराम म्हणाले, हे श्रेष्ठा, आमचे सर्व योध्दे नागपाशांनी बांधले गेले आहेत त्यांना मोकळे करावयाचे आहे. हे युध्द तू पहातोस!

त्यावर त्या देवाने म्हटले, हे युध्द केवळ एकदोन अस्त्रांनी संपणार नाही. तेंव्हा मी तुम्हांला अनेक विद्यांचे वरदान देतो. शिवाय मी आपल्या सेवेला केंव्हांहि तत्पर आहे. आपण माझी आठवण करावी. असे म्हणून तो स्वर्गस्थ देव निघून गेला.

रामने गरुडास्त्र सोडतांच सापांची गर्दी कमी झाली. सर्व गरुडांनी सापांना भक्ष बनविले आणि रामाकडील योंध्दे या संकटातून वाचले.

अशा तऱ्हेने विविध महायुध्द पेटलेले होते. रावणाच्या स्त्रिया शोकातूर झाल्या होत्या. रामाकडून रावणाचा पराभव होणार आहे आणि रावण या युध्दांत मारला जाणार आहे असे कुणीतरी सांगितले होते. तीच स्थिती कुणालाच नको होती. परंतु दैवगतीपुढे मानवी कर्तृत्वाला मर्यादा पडतात हे कांही खोटे नाही. रावणाची लंका युध्दमय बनली होती. सर्वांच्या मनांत, बोलण्यांत युध्द हाच विषय होता. रामाकडील पराभवाचा गोष्ठी ऐकून रावणाच्या पक्षांतील

लोकांना आनंद होत होता. कधी रावणाला विजयश्री माळ घाली तर कधी रामाच्या बाजूने असे सारखे होत होते. बिभिषणाचे मन मात्र रामाकडं धाव घेत होते.

महाराज रावणाचाहि रथ आता रणांगणावर आला. सहस्त्र सूर्यांचा प्रकाश धारण करणारा त्याचा रथ दिव्यतेने चमकत होता महाभयंकर आवाज करीत तो रथ वायुवेगाने येत होता. क्षणांत सारे रणांगण महाराज रावणाच्या नावाने निनादून गेले. पहिली भेट झाली ती बिभिषणाची रावण त्याला म्हणाला तू माझा नीच भाऊ आहेस. तुला मारुन मला यशहि मिळणार नाही व सुखहि होणार नाही. ज्या दिवशी तू शत्रूशी संगनमत केलेस त्याच दिवशी तू मला मेला आहेस. भूमिगोचरांच्या कळपांत तुझी काय किंमत होणार आहे हे मला माहित आहे. तू माझ्‍ यासमोरुन दूर निघून जा. नाहीतर भ्रात-हत्येचं पातक मला लागेल. इतकंच नव्हे तर तुझ्या हृदयाला छेदणारा माझा बाणहि विटाळेल.

बिभिषण म्हणाला, तुझ्या वल्गना आता मी ऐकत बसत नाही. युध्दक्षेत्रावर कुणी कुणाचा भाऊ नसतो. मृत्यु हाच एक मित्र इथे असतो. त्या मित्राची अशि तुझी ताटातूट झालेली दिसते. माझ्या या शस्त्रांनी त्या मित्राची भेट घडवून आणतो.

असे म्हणून बिभिषणाने अष्टमीच्या चंद्राच्या आकाराचे बाणांनी रावणाच्या रथाची ध्वजा उडवून लावली तर रावणाने बिभिषणाचा रथ जमिनदोस्त केला. परस्परांवर आघात करणाऱ्या या दोन बंधूंना पाहून रावणाचा अत्यंत बलवान पुत्र इंद्रजित वडिलांच्या मदतीसाठी निघाला. त्याचवेळी लक्ष्मणाने त्याला वाटेत अडविले.

दोघांचे भयंकर युध्द झाले. अशावेळी रामाने नागपाश अस्त्र सोडले, या अस्त्राने शम्भु, स्वयंभु, कम्भोवर, इंद्रवज्र, महादैत्य, कुम्भ, सुमाली इत्यादि थोर थोर योध्दांना बंदिस्त करुन व रथास बांधून ठेवण्यात आले.

इंद्रजिताला विराधिताने बाधून टाकले. इतका पराक्रमी वीर पण एखाद्या झोपी गेलेल्या वीराप्रमाणे शांत झाला होता. इतक्यांत लक्ष्मण स्वत: रावणाच्या समोर गेला. त्याचवेळी बिभिषण आपल्या भहानक त्रिशुल शस्त्र रावणाच्या अंगावर फेकणार होता. ते शस्त्र प्रचंड आवाज करीत रावणाच्या अंगावर जाणार तोच लक्ष्मणाने मंत्र सामर्थ्याने ते मध्येच जाळून भस्म केले.

रावणानें लक्ष्मणाची ती दैदिप्यमान मूर्ति पाहिली. असले गोजरे रुप त्याने आजवर पाहिले नव्हते. रावणालाहि मोड पडावा असे ते दिव्य मानवी रुप पाहून रावण पाहातच राहिला.

पहिल्यांदा रावणाला वाटले कुणी स्वर्गीय देवच आपल्यासमोर आहे. असले मनोहारी रुप त्याने पाहिले नव्हते. त्याचे नेत्र धन्य झाले परंतु हा विचार क्षणभरच टिकला. दुसऱ्याच क्षणी रावणानें अत्यंत तुच्छ शब्दांत लक्ष्मणाची निंदा केली. इतकेच नव्हे तर त्याच्या कुल-वंशाचाहि निंदा केली. लक्ष्मण स्वभावाने अत्यंत तेजस्वी होता. त्याला तो निंदा सहन झाली नाही. त्याने रावणास म्हटले, हे रावणा तू स्वत:लजा समजतोस तरी काय? अनेक विद्या तुझ्या सेवेला तयार असल्या तरी एखाद्याचे दैव बदलण्याचे सामर्थ्य तुझ्या विद्येत नाही विनाश करणारी पुष्कळशी साधने तुझ्या जवळ आहेत, हे खरे, पण त्या मृत्युपासून तुझी तरी सुटका होणार आहे का! एका स्त्रीसाठी स्वकुलाच्या नाशासाठी तू तयार व्हावेस आणि चिरकालपर्यंत स्वत:चे नांव दुष्ट पुरुषांच्या मालिकेत गोंवले जावे यासाठी तू कां प्रयत्न करीत आहेस? विज्ञानामुळे तू आज महाप्रतापी आणि बलिष्ठ दिसत असला तरी अतिगर्वामुळे तुझा आत्मा बलहिन झालेला आहे. तुझ यांतील आत्मिक सामर्थ्य लोपत चालले आहे. दारू च्या प्राशनान एखादा प्रचंड मदोन्मत्त व्हावा तसा तू झालेला आहेस. तुझ्या हृदयांत धर्माचा उजेड नाही, विवेकाला तू पारखा झाला आहेस, साधे सामाजिक शिष्ठाचारहि

पालन करण्याचे भान तुला उरलेले नाही लंकेचे राज्य म्हणजे जगांत श्रेष्ठ हा गैरसमज तू करुन घेतला आहेस. पण हा गैरसमज दूर करायला मी एकटाच समर्थ्य आहे. दीर्घकाळापर्यन्त तुझी नेंभळ्या लोकांशीच गांठ पडली असलेल्याने स्वत: बलवान असल्याचा तू दावा मांडत आहेस.

पण भारतभूमीला कलंक ठरलेल्या तुला यमसदनाला पाठवितो म्हणजे मानवजातीला सुखानें तरी राहता येईल.

लक्ष्मणाला पाहून सुरुवातीला जो आनंद झाला तो कमी झाला. हा रामाचाच भाऊ माझ यासमोर उभा आहे. तेव्हा यालाच ठार केले म्हणेजे युध्द संपेल असा विचार करुन रावणाने भयानक हास्य केले. त्या हसण्याने त्या रंणागणावर मोठा आवाज झाला. जंगलांतील पशुपक्षी देखील घाबरू न गेले. अनेकांच्या कानठाळ्या बसल्या. प्रचंड रथावर बसलेला तो रावण एखाद्या प्रचंड डोंगराच्या आकाराचा दिसत होता. त्याच्या हातांतील वेगवेगळी शस्त्रे चमकत होती. त्याचा रत्नजडित मुकुट चमचमत होता. त्याच्या गळ्यात असलेला हिऱ्यांचा कंठा फारच सुंदर दिसत होता. त्या कंठयात रावणाच्या चेहऱ्याची नऊ प्रतिबिंबे दिसत. त्यामुळे त्याला दहा तोंडे आहेत की काय असा भास होत असे. लक्ष्मणाला रावणाचे ते प्रचंड रुप पाहून कौतूक वाटले.

इतक्यांत रावणानें वेगाने एक प्रचंण्ड अस्त्र हातात घेतले. रावणाचे ते उग्ररुप म्हणजे प्रत्यक्ष यमाचाच अवतार वाटू लागला. सैनिक थराथरा कांपू लागले. इतक्यात एक मोठा आवाज झाला आणि अस्त्र लक्ष्मणाच्या छातीवर येऊन आदळले. त्याचबरोबर लक्ष्मण जमिनीकोसळून खाली पडला.

ते दृष्य रामाकढून पाहवले नाही. लक्ष्मण कोसळताच श्रीराम मूर्च्छित झाले. त्यांच्या बंधुप्रेमालाच जणूं रावणाचे ते शस्त्र लागले होते. तरी परंतू लगेच सावध होऊन रामाने रावणावर प्रतिहल्ला चढविला. कांही सौनिकांनी लक्ष्मणाला तेथून हलविले. रामाचे सर्व लक्ष लक्ष्मणाकडे लागले होते. तेंव्हां रामाने रावणाला म्हटले, तुझी परवानगी असेल तर लक्ष्मणाची काळजी मला घेतां येईल. युध्दाला आम्ही घाबरतो असे नाही. पण लक्ष्मणाला मी माझ्याबरोबर इथे आणले. त्याला सुखरुप पाहण्याची माझी तीव्र इच्छा आहे. रावण म्हणाला, आम्ही तेवढे उदार आहोत. तुम्हाला लक्ष्मणाची काळजी घ्यायला आमची परवानगी आहे. पण मला वाटते तो आता इहलोकांत राह्यला नाही. रावणाचा हल्ला किती प्रखर असतो हे आता तुला कळले.

रावणाच्या एका आघाताने तुमचे सारे सैन्य नाश पावेल. तरी तू शहाणा असशील तर युध्द थांबवून अयोध्येला परत जा. सीता आता माझी झाली आहे. आणि माझी होऊन राहणार आहे.

असे कटू-वचन बोलून रावण आपल्या निवासांत परतला.

लक्ष्मणाचा सुंदर देह जमिनीवर पडलेला होता. त्याच्या अंगावरील वस्त्रे अस्ताव्यस्त झालेली होती. चेहऱ्यावर अत्यंत शांत असे विचार दिसत होते. श्वास अगदी मंद मंद चालत होता. तो प्रकार पाहतांच रामाच्या डोंळ्यातून अश्रु वाहू लागले. सारे विर रामाच्या दु:खाने व्याकूळ झाले. सर्वांची अंत:करणे त्या करुण विलापाने मिळवटून निघू लागली.

राम म्हणत होते: लक्ष्मणा, मला सोडूनच जायचे ठरविले होते तर या यु ध्दाचा प्रसंगच का स्विकारला? आता माझ्या सर्व सुखदु:खात सावलीसारखा कोण उभार राहणार? हे विश्वच असे निर्दय का झाले आहे.? माझ्या पूर्वकृत पापाचाच हा प्रताप तर नाही ना? अयोध्येला गेल्यावर मी कसे तोंड दाखविणार ? लक्ष्मणाचे काय झाले म्हणून विचारल्यावर धनुर्धारी रामाच्या अस्तित्वांतहि लक्ष्मणाचे प्राण निघून गेले म्हणून उत्तर कसे देऊ? रावणापेक्षाहि या यमराजाने माझा पुरता सूड घेतला. माझं राज्य, माझे आई-वडील हिसकावून घेऊन या नियतीनं मला वनांत पाठविलं. त्यांतहि समाधान झालं नाही. म्हणून माझी प्रिय सखी सीतादेवी हिलाहि माझ्यापासून दूर नेलं. आणि आता माझ्या ह्रदयाचा तुकडाच त्यानं तोडला. सीतेशिवाय मी इतका काळ जिवंत तरी राहिलो. पण आता या माझ्या लक्ष्मणाशिवाय मी कसा जिवंत राहणार? मग ते सर्व वीर योध्दांना उद्देशून म्हणाले, हे बिभिषणा, सुग्रीवा, भामंडला, मी आता तुम्हांला काय सांगू? तुमच्या सारखे विद्याधर माझ्या मदतीला असतां मी माझा भाऊ गमावून बसलो. आता तुम्ही जारे जा. उदया माझ्या भावाच्या चितेतच मी प्रवेश करुन माझ्या दु:खाचा नाश करीन.

त्या नंतर अत्यंत चतुर अशा जाम्बुनदाने रामाची समजुत काढण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, हे युगपुरुषा, तुम्ही असे का म्हणत आहांत? लक्ष्मणाला दिव्य अस्त्रांन केवळ मूर्च्छा

आलेली आहे.  या मंत्रावर औषध आहे.  जेथे अपाय असतो तेथे उपायहि असतो.  शिवाय आपले बंधु, हे केवळ साधे पुरुष नाहित.  ते नारायण आहेत.  अशाप्रकारचे मरण त्यांना येणार नाही.

परंतू रामाला ते पटेना.  त्यांची समजूत सर्व लोकांनी काढली पण लक्ष्मणाची वाणी ऐकायला रामाचे कान आतूर झाले होते.  राम लक्ष्मणाला स्पर्श करणार इतक्यांत जाम्बुनद म्हणाला,  प्रियदर्शी रामाने लक्ष्मणाच्या शरीराला स्पर्श करु नये.  कारण मंत्राचा प्रभाव रामाच्या शरिरावरहि होईल.

लगेच जाम्बुनदाने लक्ष्मण जिथे मूर्च्छित पडला होता ती जागा शुध्द करवली, वा चारही बाजूस तंबू उभे करुन प्रमुख प्रमुख योध्दांना तिथे जागता पाहरा ठेवायला सांगितले.  कारण रावणाकडील राक्षस आपल्या विद्येच्या प्रभावाने लक्ष्मणाला पळवून नेतील आणि मग तो शत्रुचया हाती लागेल.  रात्रीची ती वेळ होती.  मोठमोठी गिधाडे जमा झालेली होती.  सारी युध्दभूमि रक्तलंछित झालेली होती.  क्षुद्र अभिमान आणि भोगलालसेने मानवाने मानवाचे मुडदे पाडले होते.  जीवण हे सुंदरतेने जगण्यासाठी असते हे तत्त्व माणूस विसरतो.  जगांतील कठीणातील कठीण प्रश्न मानव अत्यंत शांतीने सोडवू शकतो.  हिंसेचं उत्तर अहिंसेने देणेच शेवटी श्रेयस्कर ठरते.  द्वेषानें द्वेष वाढतो हे अनेकंदएिळ घंडले आहे.  पण हे सर्व मानवाला तेंव्हा समजते जेव्हा महाभयंकर विनाश त्यांच्या नजरेस येतो.

लक्ष्मणाच्या मूर्च्छित होण्याच्या किंब्रहुना तो मेल्याच्या वार्ता लंकेत पसरल्या.  महसती सीतेला ही वार्ता ऐकून मूर्च्छा आली.  ती धाडकन् जमिनीवर आदळली.  मोहमयना तुझेच नांव म्हणजे दु:ख होय असे या संसाराकडे पाहिले म्हणजे म्हणावे लागते.  ज्यांना जीवन निर्लेपपणे जगतां येत नाही त्यांच्या यातना पाहिल्या म्हणजे किती वेदना होतात नाही!

सीता कांही वेळाने शुध्दीवर आली. तीहि विलाप करुन रडू लागली.  लक्ष्मणाची अवस्था पाहून राम जिवंत राहणार नाही अशी तिची खात्री झाली कारण रामाचे लक्ष्मणावरील प्रेम तिला अधिक ठाऊक होते.  सीता शोकविव्हल आहे हे पाहून रावणाला कांहीसा दिलासा वाटला.

रावणहि खरे पाहिले तर आतून दु:खीच होता. त्याचे अत्यंत प्रिय असे भाऊ युध्दात मरण पावले होते. कांही कैद्री म्हणून रामाने पकडून ठेवले होते. लक्ष्मण तरी मेला या कल्पनेने ती आपे दु:ख हलके करण्याचा प्रयत्न करीत होता. उद्या सकाळी पुन: युध्द करता करता यावे म्हणून सर्व सैनिक व महान योध्दे विश्रांती घेत होते.

रावणाच्या मनांत एक विचार आला. त्याला वाटले की बहुरुपिणी विद्या आपण साध्य केली तर आपणाला लक्षावधी रुपे घेऊन एकटयाला हे महायुध्द करता येईल. त्यामुळे आपणाला कुणाच्याहि मदतीशिवाय लढतां येईल. आपले सर्व बांधव रणांगणात मेले तरी मग हरकत नाही. हा विचार त्याच्या डोक्यत येताच त्यांने आपल्या आवडत्या मंदोदरीला हा निर्णय कळविला. ती म्हणाली, तुम्ही कितीहि विद्या साध्य केल्या, सारे तैलोक्याचे बळहि एकत्र केले तरी जोपर्यंत सीता सतीं येथे आहे तोपर्यंत हे सारे व्यर्थ आहे. अद्यापि माझे म्हणणे आपण ऐकावे आणि त्या सतीला रामाला परत करावी. लंकेचे शांत रुप नष्ट झालेले तुम्ही पहात आहांत. सारी जनता आज जरी युध्दाने पागल होऊन लढत असतली तरी युध्दाची भावना फार वेळ टिकत नाही. राक्षसांचा बिमोड होईल हे जैन मुनींनी कथन केलेले भविष्य खोटे ठरणार नाही. ते खोटे करावयाचे असेल तर तुम्ही अत्तांच जाऊन लक्ष्मणाला लागलेली शक्ति परत द्या. रामाला आनंद होईल. त्याला सन्मानापूर्वक सीता परत करा. भारतवर्षांची शांतता केवळ विद्याधरांच्या मूर्खपणाने भंग पावत आहे असा कलंक लागू देवू नका.

रावण सुरवातीला राग आला. पण त्यालाहि वाटले की युध्दाला विराम द्यावा. पण मानहानी होईल याचे शल्य त्याच्या हृदयात बोचत राहिले. साध्या पादचारी रामाला रावण भ्याला ही अपकीर्ति नको म्हणून पुन: त्याने बहुरुपिणी विद्या साध्य करण्याचे ठरविले. व तो तडक श्रीशांति-भगवंताच्या मंदिरात गेला. सर्व प्रकारच्या खाण्यापिण्याचा त्याने त्याग केला. अर्धपद्मासन घालून त्याने विद्यासिध्दीसाठी ध्यान चालू केले.

लंकेतील वीर लोक रावणाचा हा उपक्रम पाहून चकित झाले. रावण कांहीतरी भयंकर साधना करीत असल्याचे सर्वांना कळाले. लंकेतील लोकांनी जिनमंदिरातून पार्थना सुरु केल्या. रावणाच्या या सिध्दीमध्ये कुणी विध्न आणू नये म्हणून सर्व प्रकारची दक्षता घेण्यांत आली.

रावणाची शारीरिक व मानसिक क्षमता अत्यंत बलिष्ठ होती देवाधिदेव अरिहंताची प्रार्थना करण्यांत किंवा तीर्थंकाराची पूजाआराधना करण्यांत तो इतका तल्लीन होत असे की भक्त आणि भक्ति हे वेगळे दिसून येत नसत. त्यामुळे अनेक प्रकारच्या ऋध्दि-सिध्दी त्याच्यापुढे सदैव हात जोडून उभ्या असत. भक्तित रावण तल्लीन झाला म्हणजे देहादिकांचे भान तो विसरत असे. त्याला हे माहित होते की, जैन भक्ताने देवाला काही मागू नये. कारण देव कांही देत नाही. पूजेने ऐश्वर्य आपोआपच मिळते. देवाला त्याचे काय? हिंदूधर्माप्रमाणे जैन देव या जगाच्या उठाठेवीत भाग घेत नाही. तो स्वत: एखाद्या आरशाप्रमाणे निर्मळ असतो. प्रत्येकाला आरशांत पाहून आपल्या स्वरुपाचे दर्शन एवढाच आरशाचा हेतू आहे. पण हे माहित असूनहि कधी कधी क्षुद्र जातीचे स्वर्गातिल देव त्याच्या सेवेस सदैव सज्ज असत. त्यामुळेच रावणाच्या ऐश्वर्यात दिवसेंदिवस वाढ होत असे. रावणाला हे माहित होते की, त्याला प्राप्त झालेले हे ऐश्वर्य केवह अर्हत् देवाची पूजा-भक्ति केल्याने झालेले आहे. परंतू सीतेसारखी स्त्री माझ्यासारख्या पराक्रमी, ऐश्वर्यसंपन्न व विद्याधरीशी लग्न करायला तयार होत नाही, यांत त्याला स्वत:चा अपमान वाटला आणि याच अभिमानाला, खोटया प्रतिष्ठेला तो बळी पडला. जगाचे नेतृत्व स्वत:कडे आहे आणि स्वत: जे करु तेच झाले पाहिजे या वृथा अभिमानाने जगावर ओढवलेल्या आपत्तींची गणनाच करतां येत नाही. जीवनाला जे विषारी दांत प्राप्त होतात ते याच अहंकाराने आणि फाजील अभिमानाने. त्या अहंकाराचा विनाश अटळ आहे.

इकडे लक्ष्मण निपचित पडला होता आणि काय करावे अशा विवंचनेत सारे होते. सारे वातावरण कसे मृतवत होते!

इतक्यांत आकाश मार्गातून एक अत्यंत तेजस्वी विमान जात होते. त्या विमानाचा स्वामी होता प्रतिचंद्र विद्याधर. त्यानं आकाशातून पाहिले की एक भयंकर युध्दभुमि खाली आहे आणि

अनेक प्रेते पडलेली आहेत. असंख्य वानर सैन्यहि अगदी मृतवत् शांत आहे. त्याला कौतुहल निर्माण झाले. तो खाली आला. अनेक विद्याधरांना पाहून त्याने त्यांना नमस्कार केला. आणि विचारले, हे महाभाग्यवंतांनो, तुम्हाला असे काय झाले आहे? तुम्ही असे दु:खी कां? मी कांही मदत करु शकतो कां? मला आपले दु:ख सांगा?

रामाने घडलेली सर्व वार्ता साश्रू नयनाने सांगितली. ती सर्व वार्ता ऐकून प्रतिचंद्र नांवाचा विद्याधर देखील गहिवरला. तो कांही वेळ शांत होता. त्याच्या डोक्यांत एक विचार चमकून गेला. तो म्हणाला, हे रामा, तू भाग्यवंत आहेस. तुमचेच बंधु भरत यांच्या परिचायाची एक अत्यंत सुंदर कन्या विशल नांवाची आहे. तिला येथे आणता आल्यास हे फार मोठे वाटणारे संकट क्षणांत नष्ट करतां येईल. ते कसे? त्या विशल्येचा आणि या लक्ष्मणाला लागलेल्या शक्तिचा काय संबंध? ---हनुमानाने विचारले.

त्यावर प्रतिचंद्र म्हणाला, हे विद्याधरा, आता वेळ फार थोडा आहे. सकाळ होण्यापूर्वी लक्ष्मणाला शुध्दीवर आणले पाहिजे. प्रथम तू श्रीहनुमान, भामंडल, आणि अंगद या तिघांना भरताकडे पाठव. ते भरताला भेटून व तेथून माहिती घेऊन विशल्यादेवीला घेऊन येतील. विशल्येच्या आंघोळीच्या पाण्याने लक्ष्मणाचा दाह शांत होईल. तिच्या पुण्यकर्माने ती एकटीच अशी स्त्री आहे की अनेक वाईटातून वाईट व जीवघेण्या प्रसंगातून माणसे वाचतात. ती राजा द्रोणमेघ यांची मुलगी आहे. इतक्या रात्री ती कशी येईल हेच कठीण काम आहे. ही कामगिरी हनुमान पार पाडील कारण तो उच्च विद्याधर आहे आणि तुमचा चाहता आहे.

रामाने त्याप्रमाणे करावयाचे ठरविले. त्यांनी श्री हनुमानाला जवळ बोलावून एक गुप्त निरोप भरताला दिला आणि खुण म्हणून राममुद्रिंका दिली.

श्री हनुमान, भामंडल आणि अंगद हे तीनहि विद्याधर या कामगिरीसाठी तडक निघाले.

अयोध्येला जेंव्हा ते पोंचले तेव्हा मध्यरात्र होत आली होती. अशा मध्यरात्री भरत महाराजांना कोण उठवू देणार ? पण हनुमानांनी फार विनंती केल्यावर मधुर वाद्यांचा आवाज करुन भरतेश्वरांना जागे करण्यांत आले. भरताला आश्चर्य वाटले की झोपायला जाऊन अद्याप फारच थोडा वेळ झाला आणि मधुर वाद्ये कां वाजत आहेत? त्यांनी सेवकाला विचारले असतां तो म्हणाला, राजेश्वर प्रभु श्री रामाकडील कांही वार्ता आलेली आहे. आपणाकडे विद्यासंपन्न श्री हनुमान आलेले आहेत!

श्री भरताला कांहीतरी भयंकर घडले असल्याची शंका आली. ते धांवतच मित्रप्रीति नांवाच्या मोठया खोलीत आले. ती भरताची आवडती खोली होती. तेथेच बसून परराज्यांतील इतरांशी ते बोलत असत. श्री हनुमानाने भरताला पहिल्यांदाच पाहिले होते. दोघांनी प्रेमाने एकमेकाला मिठी मारली. हनुमानाच्या डोळ्यांत अश्रु पाहून भरतेश्वरांनी विचारले, सर्व क्षेम तर आहे ना?

हनुमान म्हणाला, राजेश्वर काय सांगावे? श्री रामाची सीता रावणासारख्या विद्वान व चारित्र्यसंपन्न व्यक्तिनें बळजोरीने हिरावून घेतली. त्यासाठी श्री रामाने युध्द आरंभिले आहे. त्या महायुध्दांत लक्ष्मण रावणाच्या विद्यास्त्राने मूर्च्छित होऊप पडले आहेत. सकाळ होण्यापूर्वी ते जर सावध झाले नाहीत रत आपल्या घराण्यावर फार मोठे संकट ओढावेल.

ही वार्ता ऐकतांच रावणासंबंधी भयंकर क्रोध श्री भरताच मनांत निर्माण झाला. त्याच्या डोळ्यांतून अग्नीचा वर्षाव होऊ लागला. त्याच्या मुठी वळल्या गेल्या व ते रागाने म्हणाले, आम्ही सर्व समर्थ आहोत रावणाची रग जिरवायला. अयोध्येची संपूर्ण शक्ति रामाचीच आहे. त्यांनी हे अगोदर कळविले असते तर भरताचे संपूर्ण सहाय्य त्यांना मिळाले असते.

हनुमान म्हणाला, राजेश्वरा असे रागावू नका. जे होणार आहे त्याला कोण कसे आडविल? संसारांतील जिवांची हीच तर शोकांतिका आहे. उघडया डोळ्यांनी साधुसंतांची विटंबना पहावी लागते. सती सीतेची मानहानी सहन करावी लागते. सामर्थ्य असूनहि

रावणासारख्या आपल्या मनावर एवढा ताबा ठेवता येत नाही.  सहस्त्रावधि रुपसुंदर लावण्यलतिका व स्वर्गीय अप्सरा त्याच्या सेवेला असतांना सीतेच्या पावित्र्याला कलंक लावण्याची दुर्बुध्दि त्याला झाली.  आता जे आम्ही इथे आलो ते द्रोणमेघाची मुलगी विशल्या हिला घेऊन जाण्यासाठी. तिच्याजवळ असे सामर्थ्य आहे की, विद्यास्त्रांमुळे कुणी मूर्च्छित झाले असतील तर त्या विद्यास्त्रांचा प्रभाव तिच्या स्नानाजलाने नष्ट होतो.  आपणांस आमचि विनंती आहे की, आपण पत्र देऊन श्रीद्रोणमेघांना एवढे उपकार करायला सांगावे.

श्रीभरताने सूचना-घंटिका वाजवून दूतांना तयार होण्याची आज्ञा केली.  व एक पत्र लिहून व त्यावर मोहोर लावून ती दूताला दिली.  आणि आहेर म्हणून कांही मौल्यवान वस्त्रे व रत्नेंहि दिली.  ती घेऊन श्री हनुमान आदि मंडळी द्रोणमेघाकडे आली.

द्रोणमेघ निद्रिस्त होता.  त्यालाहि जागे करुन ही वार्ता कठविली.  भरतेश्वराची आज्ञा म्हणूनच त्याने विशाल्या नांवाच्या आपल्या उत्तम कन्येला बोलाविले.

विशल्या आश्चर्यचकित झाली की इतक्या रात्री वडिलानी तिला का बोलाविले.  जेव्हा ती वडिलाच्या खोलीत आलीा त्यावेळी तिथे अनेक विद्याधर पाहून तिला संकोच वाटला व ती लाजली.  वडील म्हणाले,

हे कल्याणमयी, तुला या विद्याधराबरोबर गेले पाहिजे.  श्री भरताचे भाऊ श्री लक्ष्मण विद्यास्त्राने जखमी होऊन पडले आहेत.  तुझ्या स्नानाच्या पवित्र जलाने त्यांना शुध्दीवर आण. तुझ्या जन्माचे वेळी असे भविष्य सांगितले होते की, अयोध्येच्या लक्ष्मणाची तू धर्म पत्नी होशील. आता तुेला विलंब न करता लगेच गेले पाहिजे.  विशल्या आपल्या अनेक मैत्रिणी बरोबर जायला सिध्द झाली.

तेथून सर्वांना घेऊन रात्रीच्या उत्तर प्रहरी ते सर्व जिथे लक्ष्मण होला तिथे आले. सारे सैनिक त्यांच्या आगमनाकडे अगदी अधिरतेने वाट पहात होते. ही अधिरता किती जीवघेणी असते हे सांगितलेच पाहिजे असे नाही.

सर्वांनी विशल्येला नमस्कार केला. विशल्येच्या स्नानाची व्यवस्था करविली. चंदनाचा लेप करविला. स्नानानंतर विशल्येने आपल्या कोमल, मृदु हातांनी लक्ष्मणाच्या अंगावर अगोदर पाण्याचा शिडकावा केला. लक्ष्मणाच्या मंद श्वास दीर्घ झाला. त्याच्याद नेत्राच्या पापण्या हलल्या. नंतर तिने चंदनाने लक्ष्माणाच्या छातीवर लेप केला. एखादया परपुरुषाच्या उघडया शरीराला स्पर्श करण्यांचा हा पहिलाच प्रसंग आणि तोही सर्वासमोर! तिला खूपच संकोच वाटला. तिच्या गालावर गुलाबी छटा चमकू लागली. पहाट होत आली. पक्षांचा कलकल आवाज आकाशांत होऊ लागला.

इतक्यांत लक्ष्मणाच्या अंगातून एक दिव्य शक्ति बाहेर पडतांना हनुमानाने पाहिली. तोच त्याने तिला घरले. त्याचबरोबर त्या दिव्य शक्तीचे रुपांतर एका सुंदर स्त्रीत झाले. हनुमानाने विचारले, तू कोण ? तुझे नांव काय?

त्यावर ती म्हणालीह, हे विद्याधरा, माझे नांव अमोघविजया आहे. रावणाच्या भक्तिप्रभावाने मी त्याला वश झाले. विशल्या नसती तर आज या सुंदर तरुणाला मरण आले असते. विशल्या ही परमप्रभावधारी स्त्री आहे. त्यामुळे मला आता इथे राहणे नाही.

असे म्हणून ती विद्या विजेच्या वेगाने आकाशांत अंतर्धान पावली.

विशल्येच्या अंघोळीचे पाणी सर्व सैनिकांवर शिंपडण्यांत आले. त्यामुळे जे मरणासन्न होते, घायाळ होते ते सारे पुनः पूर्ववत् झाले.

लक्ष्मणाने पाहिले की अत्यंत रुप-यौवनसपंन्न स्त्री त्याच्यासमोर चंदनाचे पात्र घेऊन उभी आहे. त्याच्या आश्चर्याला पारावरच उरला नाही. असले स्वर्गीय रुप त्याने कधी पाहिले

नव्हते.  तो विसरुन गेला की, ती एक परस्त्री आहे.  नंतर भानावर येऊन म्हणाला, देवी, मी आपली आगळीक केली आहे.  एखाद्या परकन्येकडे मी अशा रीतीने पहायला नको होते.

त्यावर स्त्री म्हणाली,    तुमचे दर्शन होण्यापूर्वी मी परकन्या होते.  पण मी मनांतून आपणांस वरिले आहे.  आपण माझे कांक्षित आहांत, प्रिय आहांत, आता माझे पणिग्रहण करावे.

श्री रामाच्या आज्ञेने तेंथेच लग्नसोहळा साजरा झाला.

रामाकडील सर्व सैन्याला फार आनंद झाला.  भाग्य असले म्हणजे संकटकाळ टळून माणसाला सुख प्राप्त होते,  जीवनाला अर्थ प्राप्त होतो, पूर्वजन्मीचे ऋणानुबंध जुळून येतात. विपरीत काळ आल्यावर आत्माचा वैरी बनतो.  नको नको ते विचार मनांत येऊन माणूस दीन-दुबळा बनतो.  परंतु जी माणसे विवेकी असतात ती दु:खावर शांतपणे मात करतात, आणि सुखोपभोगाचे वेळी संयम सोडीत नाहीत.  असेच जीवन साधुतुल्य असते.

रावणाकडे मात्र पुन:चिंता पसरली.  परंतु रावण तर बहुरुपिणी विद्येच्या सिध्दीत मग्न झ ाला होता.  त्याला कशाचेच भान उरले नव्हते.  त्याच्या तपामुळे कांही दिवसातच त्याला ती विद्या साध्य झाली.

श्री शांतिनाथ जिनाला नमस्कार करुन तो उठतांच एखादा मदोन्मत्त हत्ती उभा रहावा असे दिसले.  या विद्येच्या सहाय्याने आपली लक्षावधि रुपे बनवून तो रामाच्या सैन्याला नष्ठ करणार होता.  मंदिराच्या बाहेर त्यांच्या स्त्रिया आणी मंत्रीगण उभे होते.  त्या सर्वांनी रावणाचा जयजयकार केला.  रावणाने हर्षाने त्यांच्या जयजयकाराचा स्वीकार केला.  व तो सर्वांना उद्देशून म्हणाला----

जनहो, आता तुम्हांला घाबरण्यांचे मुळीच कारण नाही. आता रावण अजेय आहे. शत्रु या भुतलावरुन कायमसाठी नष्ठ होणार आहे. उद्या सकाळी रणांगणावर रामाचा मृत्यु तुम्ही पहाल.

तेंव्हा सर्वांनी पुन: त्याचा जयजयकार केला. शेकडो नरवीरांसहित रावण आपल्या महलांत गेला. त्यावेळी मंदोदरी रागावून बसली होती. तीला उदास पाहून रावण म्हणाला,

प्रिये, रावणाचा एवढा प्रताप पाहूनहि तू आनंदित कां नाहिस? पतीचे वैभव पाहून विद्याधर स्त्रीला आनंद झाला पाहिजे.

तुम्ही कितीहि वैभवशाली असलांत तरी जोपर्यंत सीता इथे बंदिस्त आहे तोपर्यंत हे सुख काय कामाचे? सुंदर खाद्यपदार्थात विषबिंदु पडावा तशा प्रकारचे हे सुख आहे. अद्यापि आपण माझी विनंती ऐकावी आणि सती सीतेला परत करावी. कुणाचेहि वैर घेणें शक्य असते पण प्रेम मिळविणे पूर्वपूण्याईशिवाय शक्य नाही. मंदोदरी म्हणाली.

रावण म्हणाला, फक्त एकाच दिवसासाठी तू शोक का करीत आहेस. रामाच्या शरीराला शिरविरहित करुन तुझ्यासमोर आणून टाकतो. तू मूळीच काळजी करु नकोस. उद्याचा दिवस आपल्या ध्येयसिध्दीचा दिवस आहे. तू हसत मुखाने माझ्या कार्याच्या पाठीमागे उभी राहा.

तिची कशीबशी समजुत काढून रावण सीतेच्याकडे गेला.

प्रमदवनांत ती अनेक विद्याधरींच्या सह बसून होती. अनेकप्रकारे तिचे कौतुक करण्यांत त्या विद्याधरी स्त्रिया रमल्या होत्या. परंतू तिचे रामाच्या ठायी जडलेले मन होते तसेच होते, रावणाच्या वैभवाने तिच्या मंनात किंचीतही अस्थिरता आली नव्हती. राम हेच जिविताचे सर्वस्व असे ती धरुन चालली होती. रावण आपल्या दिव्यरुपाने चमकत होता. त्याच्या रत्नजडीत

मुकुटाचे तेज त्याच्या चेहऱ्यावर पडले होते. त्याच्या नेत्रांतून ऐश्वर्याचा उन्माद ओसंडत होता. दिव्य वस्त्रालंकारांनी प्रत्यक्ष इंद्राचाच अवतार तो दिसत होता. त्याने प्रमदवनांत प्रवेश करताच त्याच्या नावांचा जयजयकार झाला परंतु आपल्या कानांत जणु कोणी तप्त लोहरसच ओतीत आहे असे तिला वाटत होते.

रावणाचे ते दिव्यरुप पाहून तिला भीति एकच होती ती हि की राम लक्ष्मण या निर्दय राक्षसाच्या कचाटयांतून कसे सुटतील याची तिने रावणाकडे तुच्छतेने पाहिले. स्त्रींने दर्शविलेली तुच्छता पुरुषराला वज्रपाताप्रमाणेच भासत असते. सीतेच्या देहाचा उपभोग रावणाने आपल्या मनाने घेताला होता. तिच्या उपभोगाची चित्रे त्यानें मनांतहि रंगविली होती. परंतु त्या उपभोगाने कामातुरांची तृप्ति कशी होणार ? लंकेत आणतांना जे हात त्यान वापरले होते त्याच हातांनी तिची मान मुरगाळण्याची तिव्र इच्छा त्याच्या मनांत निर्माण झाली होती. सीतेच्या नजरेतून तो विकार सुटला नव्हता.

तेव्हा रावण तिला म्हणाला, सीते, उद्या तुझ्या आवडता रामाचे डोके कापून तुला अर्पण करण्याची प्रतिज्ञा मी केली आहे. ज्या रामाच्या चिंतनाने तू वाळत चालली आहेस त्यालाच या जगांतून परलोकांत पाठविले म्हणजे तुला शांति मिळेल. लक्ष्मण, तुझा आवडता दीर माझ्या एकाच विद्येच्या प्रभावाने जमिनीवर कसा कोसळला याचे वर्णन तू ऐकलेच असशीलं. उद्या मात्र तू माझाच जयजयकार करशील. तुझ्या शीलाचा पाठीराखा राम या जगांत उरणार नाही. आणि समज आमचा पराभवच झाला आणि लंकेचे राज्य मोडून निघाले तरी अयोध्येत तुला मानांन राहतां येणार नाही. सामान्य जनता तुला भ्रष्टच म्हणणार आहे. एखाद्या फुलाचा एखाद्याने वास घेतला आहे की नाही हे कोण पाहणार ? प्रत्यक्ष तुझा आवडता, प्राणप्रिय रामहि तुझ्याकडे संशयाने पाहील तेव्हां तुला हे जग नकोसे होईल. तुला होणारी मुले-बाळे ही रावणाची आहेत असे जेव्हा जग म्हणेल तेव्हा तू कशी जिवंत राहशील? रावण मेला तरी त्याची वासना तुझ्या शरीराभोवती वाऱ्याच्या रुपाने घोंघावत राहील. रावणाचा हट्ट म्हणजे युगानुयुगे अतृप्त राहिलेल्या वासनांचा हट्ट आहे. आणि एकवेळ अशी येईल की, प्रत्यक्ष राम देखील तुझा त्याग

करील.  तुला तो लोकोत्तर पुरुष वाटतो तो देखील म्हणेल की, रावणाच्या अपवित्र स्पर्शाने तू अपवित्र झाली आहेस.  मग मात्र तुला या रावणाच्या शब्दांची आठवण होईल.

सीतेला रावणाचे से सारे शब्द म्हणजे अहंकार आणि वासना यांचे विकृत स्वरुपच होते. ती अबोल राहिली.  मनांतून तिला वाटत होते की एखादे वेळी रावणाचेहि शब्द खरे ठरतिल.  पण हा विचार फार काळ तिच्या मनांत राहू शकला नाही.

रावणाने पाहिले की सीतेची निष्ठा ही वैभवावर नाही किंवा तकलुफी नाही.  तिच्या ह्रदयांतील निष्ठा तिच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांशी निगडीत होत्या.  रावणालाहि मनांतून वाटत राहिले की सीतेला परत केले तर या सुवर्णमयी लंकेचं राज्यच पुन: उपभोगतां येईल.  परंतु शुर माणसाच्या मनांत पराभवाचं, मानहानीचं दु:ख फार मोठे असतं.

रावणाच्या मंत्र्यांनीहि रावणाला विनंती केली की, संहार टाळवयाचा असेल तर दूत पाठवून समझोता करावा. मंदोदरी पट्टराणीने तर रावणापुढे आकांत मांडला,  परंतु रावण तेवढयापुरता हो म्हणायचा. परंतु पुन: त्याच्या ह्रदयातील अहंकार जागत होई.  एवढा पराक्रमी रावण आणि भूमिचरांना घाबरला, अशा दुर्लोकिकाची त्याला भीति वाटली.

दुसरे दिवशी पुन: युध्दाच्या भेरी बाजू लागल्या. शंखनादाने सारे नभोमंडळ भरुन राहिल.  हत्तीच्या व घोडयांच्या आरडा-आरेडीने युध्दक्षेत्राला चांगलाच रंग आला.  आकाश आणि जमिन दोन्ही ठिकाणी तुंबळ युध्द माजले.  जे विमानांतून लढत हेते त्यांची शरीरे जमिनीवर तुटून पडत होती.  जणू प्रेतांचा वर्षाव करणारी महाचंडी रणदेवताच आज उदयाला आली आहे अशी शंका येऊ लागली.  रक्तप्रवाहाचे लोट वाहू लगाले.  चिलखते, मुकुटे आणि तुटलेली शस्त्रास्त्रे यांच्यावर पडलेल्या सूर्यकिरणामुळे ती चकाकत होती.  हाणा, मारा यांचा एकच हलकल्लोळ माजला होता.

रावणाने आपल्या बहुरुपिणी विद्येच्या सहाय्याने सहस्त्रावधि रावणाची रुपे तयार केली. जिथे पहावे तिथे रावणच दिसू लागे अनेकांना भ्रम निर्माण होऊ लागला की रावण कोणता?

इतक्यांत ही वार्ता लक्ष्मणाला कळाली. त्याने रावणाला ललकारले, अरे रावणा, तुझी अनंतरुपे या युध्दभूमीवर वावरत आहेत. परंतु तुझे खरे रुप कोणते आहे हे आम्हांला ठाऊक आहे. वाईट कृत्ये करणाऱ्यालाच अशी रुपे घेऊन वावरावे लागते. निष्पाप प्रवृत्तीला असल्या रुपांची गरज नाही. अरे रावणा, आता देखील तू गर्वाचा त्याग कर व माझे बंधु राम यांना शरण जा. रामाच्या आशीर्वादाने तुझेहि कल्याण होईल. पण तुझ्या ह्रदयांत माझे हिताचे बोलणे शिरणार नाही, कदाचित् या युध्दात तुझा नाशच होणार असेल तर तुला ही बुध्दि कशी होईल?

रावण म्हणाला , लक्ष्मणा, तुझ्यासारख्या कोवळ्या मुलांकडून कांही ऐकावे अशी माझी इच्छा नाही. माझ्या बहिणीचा-शुर्पनखेचा तुम्ही अपमान केला. त्यावेळी तुमचा हा अहंभावीपणा कुठे गेला होता? माझ्या बभिषणाला माझ्यापासून हिरावून घेऊन व त्याला राज्यलोभ दाखवून तुम्ही मात्र स्वत:चा नाश ओढावून घेत आहांत. तुमच्यासारख्या पादचारी लोकांनी आम्हां विद्याधरांना आवाहन करावे हे प्रशस्त नाही. परंतू तूमचे आवाहन आम्ही स्वीकारले आहे. आता त्यातून माघार घेणे हे क्षत्रियाला शोभून दिसणार नाही. तुम्हाला स्वर्गगती देऊनच मी आज परतणार आहे.

असे बोलून रावणाने फार मोठे अस्त्र लक्ष्मणाला फेकून मारले. पण आतां लक्ष्मण सावध होता. त्याने आपल्या अस्त्राने त्याचे अस्त्र अर्ध्या वाटेतच जाळून टाकले. लक्ष्मणाकडूनच रावण मारला जाईल असे मुनीवचन होते ते खरे होण्याचा रंग दिसू लागला. लक्ष्मणाने आपल्या भावाचे मनांतून स्मरण केले. आईचा आशीर्वाद मागितला आणि जितेंद्र देवाचे नांव घेऊन भयंकर विनाशारी बाण रावणावर सोडला. तत्क्षणी रावणाचा तो दिव्य देह रणांगणावर पडला. रक्ताचा प्रवाह त्याच्या वक्षस्थलांतून वाहू लागला. रावणाचा देह खाली पडतांच रावणाच्या व रामाच्या सैन्यांत मोठी लढाई जुंपली. दोघांनी खूपच चेव आला. पण सरते शेवटी रामाच्या सैन्यानें रावणाच्या सर्व सैन्याचा पडाव केला. रामाच्या सैन्याने आनंदाने जयघोष केला. रावणाकडील

योध्दे खाली माना घालून परत गेले. कांहीनीं संसारांतील नश्वरता ओळखून संसाराचा त्याग केला व ते संन्याशी बनले.

ते रणांगण आनंद आणि दु:ख यांनी भरू न गेले. ज्यांची मुले, पति आणि भाऊ युध्दात मेले होते अशा स्त्रिया शोक करीत होत्या. रावणाचे सर्व भाऊ दु:खित झाले. रावणाच्या मृत्यूची बातमी लंकेत पसरताच त्याच्या सर्व स्त्रिया जोरजोराने शोक करु लागल्या. युध्दाच्या विनाशकतेची कल्पना ही युध्दाच्या शेवटीच जाणवते. युध्द हा मानवजातीला कलंक आहे, अभिशाप आहे हे युध्द करतांना जाणवत नाी. परंतु युध्दामुळे होणार मानवजातीचा ऱ्हास हा फार मोठा अभिषाप आहे, हे फार उशीरा जाणवते. युध्दपिपासू प्रवृत्तींचा उदय हा अविवेकांतून आणि अज्ञानांतून होतो. आणि एकदा या प्रवृत्ति वाढल्या की राष्ट्रांची अपरिमित हानी होते. मानवी-संस्कृतीचा जो ऱ्हास दिसून येतो याचे कारण युध्दलालया होय. युध्दलालसेला अगदी क्षुल्लक कारणहि पुरते.

रावणाच्या मृतदेहाजवळ बिभिषण स्वत: अगोदर गेला. रावणाची ती अवस्था पाहतांच त्यांचा शोक अनिवार झाला. त्याने रावणाच्या शरीराला घट्ट कवटाळले. व तो मूर्च्छित झाला. मूर्च्छा गेल्यावर आता जगून काय उपयोग म्हणून आपल्या जवळील तलवारीने स्वत:चा वध करुन घेण्यास तो प्रवृत्त झाला. पण रामाने त्याला आवरले. राम म्हणाले, बिभिषणा, हा काय अविचार? रावणाला युध्दात शूर वीरासारखं मरण आले आहे. तो मरण पावला पण त्याची शान कांही नष्ट झाली. ज्यासाठी त्याने युध्द मांडले तो अभिमान अद्यापि त्याच्या मुखमंडलावर विलसत आहे. रावण शेवटपर्यंन्त अजेय राहिला. तुम्ही आता रावणाच्या उत्तरक्रियेची तयारी करा. प्रत्येकाचे जन्म-मरण ही ज्याच्या त्याच्या कर्मोदयाने होणारी क्रिया आहे. सारी मानवजात या जन्म-मरणाच्या फेऱ्यांत सांपडली आहे. जीवनाचा आनंद हा कर्तव्यपालनांत आहे. प्रत्येकाने आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडले आहे. आता तुम्ही शोक आवरा. आणि तुमच्यां सर्व आप्तांचाहि शोक दूर करा. तुम्ही सर्व जितेंद्रभवन आहांत. कर्माची शुभ-अशुभ फळे सर्वांना भोगावीच लागतात. या सुखदु:खात समत्व धारण करणे हेच खरे जीवन आहे. बिभिषणा, आता

शोक आवर.  ज्या शोकामुळे तुला कर्तव्याचा विसर पडला, विवेकबुध्दी नष्ठ झाली त्या शोकाला दूर कर.

रामाच्या सुमधुर आणि शांत वचनांनी बिभिषणाचा चेहरा उजळला.  युध्द म्हटले की विनाश, जय-पराजय, द्वेष-प्रतिद्वेष हे असायचेच.  त्यानें रामाच्या आज्ञेने शोक आवरता घेतला.

रावणाच्या अत्यंविधिची तयारी करण्यांत आली.  लंकेतील लक्षावधि लोक हजर होते. सारे शोकविव्हल !  एका महान ऐतिहासिक पुष्ठाच्या जणु शेवटच्या ओळी लिहिल्या जात होत्या. बिभिषणाने थरथरत्या हातांनी व भिजलेल्या डोळ्यांनी पेटलेला कापूर चितेवर ठेवला.  चिता पेटली रावणाचा नश्वर देह जळू लागला.

सर्व जनतेत एक प्रकारची नरायशतेची भावना पसरली. जीवनाच्या नश्वरतेची, वैभवाच्या क्षणभंगुरतेची जाणीव काहींच्या मनाला बोचू लागली.  जीवनाची निस्सारता लक्षांत आल्यावर केवळ आत्मकल्याणाची भावना तिव्र होणे साहजिकच आहे.  अनेकांनी मनांत निर्णत केला की, आत्मज्ञानाच्या साधनेत आपले जिवन घालवावे सुखोपभोग हे किंचित काळ सुखदायक वाटेल तरी त्यांचा अंतिम परिणाम आत्मिक सामर्थ्यांचा विनाशाच होय.  शारिरीक सुख हे खरे नसून ती एक संवेदना आहे----फसवी संवेदना आहे.

रावणाची चिता पेटली.  ज्वाळा वरवर जाऊ लागल्या.  यमाच्या जिभेप्रमाणे त्या ज्वाळा महाभयंकर भासु लागल्या.  थोडया वेळांने सर्व कांही शांत झाले.  लोक आपआपल्या घरी परतले.  महान विनाशानंतर एक विचित्र मरगळ लंकेला व्यापू लागली.  उदासिनतेची तीव्र छाया लंकेवर पसरली.  लंकावासियांचे जीवन उध्वस्त झाले होते.  छिन्नविछिन्न झाले होते.

रावणाच्या मृत्यूची वार्ता सीतेला कळाली.  तिच्या ह्रदयांत आनंदाच्या लहरी हेलावू लागल्या.  पति-दर्शनाचा अलभ्य सोहळा आज पूर्ण होणार होता-वियोगाचे कृष्णपटल फाडून श्रीरामाचे पवित्र मुख अवलोकन करण्यांचे भाग्य उदित झाले होते.  सीतेचा विश्वास खरा ठरला

होता. रामाच्या पराक्रमाची गाथा खरी ठरली होती. महाभयंकर रावणाचा विनाश म्हणजेच सीतामातेच्या शीलाचा विजय होय. भारतीय संस्कृतीचा विजय होय. स्त्रीच्या अस्मितेची बूज न राखणारी पाशवी संस्कृति कितीहि संपन्न झाली तरी तिचा विनाश मानवी मूल्य संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. देह आणि देह-भोग यावर आकारलेली रावणवादी विज्ञानसंस्कृती दु:खशिवाय काय देऊ शकेल? सीतेच्या शरीलाच अणु-रेणु रामाच्या दर्शनासाठी उत्सुक होता. चिरवियोगाचे रुपांतर मीलनांत होते. पावित्र्य आणि साधुता एकरुप होणार होती. ते सुंदर मिलन धन्य होय!

राम लक्ष्मणासहित जिथे सीतेला ठेवले होते तिथे आले निमिषमात्र त्यांनी सीतेला पाहिले.